प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. २६ ऑगस्ट २०२४**

**सिडकोच्या बामणडोंगरी गृहसंकुलांतील १०० उपलब्ध दुकानांच्या विक्रीची योजना जाहीर ३० ऑगस्ट २०२४ पासून योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस प्रारंभ**
**व्यावसायिकांना व्यवसाय वृद्धीची सुवर्णसंधी**

सिडको महामंडळातर्फे नवी मुंबईतील सिडकोच्या बामणडोंगरी येथील गृहसंकुलांतील १०० उपलब्ध दुकानांच्या विक्रीची योजना जाहीर करण्यात आली असून ३० ऑगस्ट २०२४ पासून योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस प्रारंभ होणार आहे. या योजने अंतर्गत वेगाने विकसित होत असलेल्या उलवे नोडमध्ये आपला व्यवसाय वाढवण्याची संधी लहान व मध्यम व्यावसायिकांना लाभणार आहे.

सिडकोतर्फे सातत्याने राबविण्यात येत असलेल्या या योजनांद्वारे सर्वसामान्य नागरिक, विकासक, व्यावसायिक, अशा विविध घटकांना लाभ होऊन शहराचा सर्वांगीण विकास होण्यासही हातभार लागतो.

या योजने अंतर्गत सिडकोतर्फे बामणडोंगरी गृहसंकुल, भूखंड क्र. ०२, सेक्टर-६, उलवे येथील २४३ पैकी १०० दुकाने विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. उलवे नोड हा सर्व पायाभूत सोयी सुविधांनी परिपूर्ण नोड आहे. उलवे परिसराला रेल्वे, रस्ते आणि सिडको मेट्रोद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. या दुकानांपासून सिडकोचा महत्त्वाकांक्षी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पही नजीकच्या अंतरावर आहे. यामुळे उलवे नोडला आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्व प्राप्त झाले आहे.

योजनेच्या ऑनलाइन नोंदणीस ३० ऑगस्ट २०२४ पासून प्रारंभ होणार असून ई-लिलाव तथा ई-निविदा प्रक्रियेद्वारे दुकानांची विक्री करण्यात येणार आहे.

---

**मा. संपादक महोदय,**
**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

**जनसंपर्क विभाग, सिडको**